# पंच वार्षिक अहवाल १९७६ - ७७

प्रबोधन गोरेगांव

ज्ञान प्रबोधन कला सेवा गोरेगांव

# 'प्रबोधन' गोरेगांव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था. ( Regn. No. Bom 49/72 GB BSD )
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था (Regn. No. F 2502 Bom)

★

अध्यक्ष : श्री. निळकंठ ज. सावंत
उपाध्यक्ष : डॉ. विरेंद्र धुरी एम्. बी. बी. एस्.
श्री. शरद गुप्ते बी. ए.

## कार्यकारी मंडळ
( १९७६–७७ )

कार्याध्यक्ष : श्री. पद्माकर देसाई बी. एससी. (ऑ.)
प्रमुख कार्यवाह : ,, सुभाष देसाई
सह कार्यवाह : ,, वसंत तावडे बी. ए.
: ,, विजय नाडकर्णी बी. ई. ( ऑ. ) सिव्हील
कोषाध्यक्ष : ,, सुरेश सैतवडेकर

—: सभासद :—

श्री. मनोहर अदवानकर एम. एससी.
,, सुरेश चव्हाण बी.ए.
,, अरविंद सोवनी बी. एससी.
,, गणपतराव सारंग जी.डी. आर्ट
,, दिलीप साळवी बी. एससी (ऑ.)
,, विलास पेणकर
श्री विलास देवरुखकर बी.एस्सी (ऑ.)
,, महादेव खानोलकर
,, सदानंद सुर्वे
,, सुभाष पारकर
सौ. उषा जोशी

अंतर्गत हिशेब तपासनीस
श्री. रामचंद्र जोशी बी. कॉम.

सनदी लेखापाल
मे. एस. एस. नायक आणि कं.

**कार्यालय :**
'विद्युत', लोकमान्य टिळक नगर रस्ता क्र. ४,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगांव ( प. ),
मुंबई ४०० ०६२.

**संपर्क :**
रंगसेवा
फिल्मिस्तान जवळ, स्वामी विवेकानंद मार्ग,
गोरेगांव ( प. ), मुंबई ४०० ०६२
दूरध्वनी : ६९ ४१ ५७

# 'प्रबोधन' गोरेगांव

## पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा

**'प्रबोधन गोरेगांव'** या संस्थेची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. २९ ऑक्टोबर १९७७ रोजी रात्री ९ वा.** केशव गोरे स्मारक सभागृह. आरे मार्ग, गोरेगांव (प), मुंबई ६२ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :-**

१. प्रास्ताविक

२. सन १९७६-७७ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद ( हिशेब तपासनीसांच्या अहवालासह ) वाचून मंजूर करणे.

**कॉफी पान**

३. नवीन वर्षाकरिता (१९७७-७८) घटनेच्या कलम ७ (ई) प्रमाणे अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा)

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५ अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून
**पद्माकर देसाई**
कार्याध्यक्ष

**सुभाष देसाई**
प्रमुख कार्यवाह

गोरेगांव, मुंबई-६२.
दिनांक १० ऑक्टोबर १९७७

---

**विशेष सूचना :** १) संस्थेचे जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ 'विद्युत' लो. टिळक नगर रस्ता क्र. ४, गोरेगांव (प.) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २५-१०-७७ ते २७-१०-७७ पर्यंत रोज रात्रौ ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येतील.

२) कोणाहि सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या लेखी दि. २८-१०-७७ पूर्वी कार्याध्यक्षांकडे सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

४) निवडणूकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले लेखी अर्ज दि. २८-१०-७७ पूर्वी 'विद्युत', लो. टिळक नगर रस्ता क्र. ४, गोरेगांव (प.) येथे रात्री ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# 'प्रबोधन' गोरेगांव

## पाचवा वार्षिक अहवाल
## १९७६ - ७७

**प्रबोधन गोरेगांव** या संस्थेच्या दि. ३० जुन १९७७ रोजी पूर्ण झालेल्या पाचव्या वर्षातील कार्याचा अहवाल आणि हिशेब पत्रके सादर करताना कार्यकारी मंडळास आनंद होत आहे.

**कार्यकारी मंडळ आणि सभा :** संपूर्ण अहवाल सालात कार्यकारी मंडळाच्या १२ सभा घेण्यात आल्या व त्यांची सरासरी उपस्थिती १० होती. स्वीकृत सभासदांसह कार्यकारी मंडळाची सभासद संख्या १६ होती.

**उपक्रम आणि कार्यक्रम:** आज पर्यंतच्या काला-वधित संस्थेने सुरु ठेवलेल्या विविध उपक्रमांना शैक्षणिक व सांस्कृतिक वर्तुळांमध्ये एक दर्जेदार प्रतिमा प्राप्त झाली आहे. ही प्रतिमा अधिक उज्ज्वल करण्याकडे यावर्षी कार्यकारी मंडळाने विशेष लक्ष पुरविले. संस्थेचा प्रत्येक उपक्रम हा सर्वतोपरी उपयुक्त व्हावा आणि प्रत्येक कार्यक्रम हा शिस्तबद्ध आणि पूर्णतः समाधान देणारा असावा याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात आले. एकंदरीत हे वर्ष अतिशय धामधूमीचे गेले. विशेषतः संस्थेने आयोजित केलेल्या **मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलनाचे २२ वे अधिवेशन** म्हणजे संस्थेच्या वाटचालीतील एक मैलाचा दगड ठरावा इतक्या परिपूर्णतेने हा भव्य सोहळा सादर करण्यात आला होता. कार्यकारी मंडळास या घटनेचा सार्थ अभिमान वाटतो.

### शालेय आणि महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा ( वर्ष ४ थे )

महाराष्ट्रात अन्यत्र जरी विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वस्पर्धा मोठ्या संख्येने घेण्यात येत असल्या तरी अलीकडे मुंबईत अशा स्पर्धा कमी झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर 'प्रबोधन'ची वक्तृत्व स्पर्धा म्हणजे अखिल महाराष्ट्रातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सातत्याने आवाहन करणारी ठरली आहे पुणे, नासिक, अहमद-नगर, देवगड, इचलकरंजी, कोल्हापूर, डोंबिवली अशा दूर दूरच्या ठिकाणांहून विद्यार्थी स्पर्धक वक्तृत्वकलेच्या नैपुण्याची सर्वोच्च कसोटी लागलेल्या या स्पर्धेत मोठ्या हिरीरीने भाग घेतात. यावर्षी दि. १९ व २६ सप्टेंबर रोजी पाटकर महाविद्यालयात घेण्यात आलेल्या स्पर्धा-मध्ये शालेय गटात ७३ तर महाविद्यालयीन गटात ४५ विद्यार्थ्यांनी स्पर्धा अधिकाधिक रंगतदार केली. शालेय गटात सर्वोत्कृष्ट संघाचा मान मिळवून अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूलने 'कै. कृष्णाजी गोविंद सैतवडेकर' स्मृति ढाल पटकाविली तर महाविद्यालयीन गटात हाच बहुमान परळच्या शेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालयाने प्राप्त करुन 'कै. तरुलताबाई गुप्ते' स्मृति ढाल मिळविली. या व्यतिरिक्त अनेक रोख बक्षिसे व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. स्पर्धांचे परीक्षण श्री. सदानंद नाईक, प्रा. दिगंबर पाध्ये, प्रा. सुधाकर देशपांडे व प्रा. अंकुश सावंत यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. राधाकृष्ण नार्वेकर यांना पाचारण करण्यात आले होते.

### रंगावली प्रदर्शन ( वर्ष ५ वे )

लागोपाठ पाचव्या वर्षी संस्थेने गोरेगांवातील हौशी कलाकारांचे नेत्रदिपक रांगोळी प्रदर्शन भरविले होते. स्टेशन मार्गावरील आय्. बी. पटेल महापालिका शाळेत दि. १६-१०-७६ ते ३१-१०-७६ पर्यंत भरलेल्या या भव्य प्रदर्शनास १८३५० प्रेक्षकांनी भेट देऊन कला-कारांच्या कलागुणांचे कौतुक केले व नित्य नवीन

कलाकारांना प्रकाशात आणण्याच्या संस्थेच्या धोरणाचे स्वागत केले.

जुलूस : संस्था–सभासदांसाठी खास ठेवण्यात आलेल्या या कार्यक्रमास अपेक्षेप्रमाणेच फार मोठ्या संख्येने प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला. राज्य नाट्य स्पर्धेत दैदिप्यमान यश मिळविलेल्या या प्रायोगिक नाटकाचा हा प्रयोगहि अत्यंत रंगतदार व नेहमीप्रमाणेच बुध्दीला चालना देणारा झाला. याचे श्रेय जसे मूळ नाटककार बादल सरकार व अनुवादिका अनुया पालेकर आणि दिग्दर्शक अमोल पालेकर यांना आहे. त्याचप्रमाणे या प्रयोगातील व्यक्तिरेखा जिवंतपणे साकार करणाऱ्या बहुरुपीच्या अप्रसिद्ध परंतु कसदार कलाकारांना आहे.

## एकांकिका स्पर्धा (वर्ष ५ वे) आणि नाट्योत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीहि हौशी नाट्यसंस्थांच्या मराठी एकांकिकांची स्पर्धा दि. २५ डिसेंबर ते २९ डिसेंबर पर्यंत सतत पाच दिवस घेण्यात आल्या. साहित्य संमेलन व नाट्यौत्सवासाठी उभारण्यात आलेल्या प्रशस्त रंगमंचावर आणि भव्य खुल्या नाट्यगृहामध्येच या स्पर्धा घेण्यात आल्यामुळे कलाकारांचा आनंद आणि हुरूप द्विगुणित झाला होता. विविध नाट्यसंस्थांनी सादर केलेल्या एकूण २४ एकांकिकांमधून सुमारे २७५ कलाकारांनी भाग घेतला. सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रयोगाचे प्रथम पारितोषिक रोख रु. ५००/– आणि कै. केशवराव दाते फिरता चषक बोरिवलीच्या अस्मिन थिएटर्स या संस्थेने सादर केलेल्या '**स्मशानातला गुलमोहर**' या एकांकिकेस देण्यात आला. स्पर्धांचे परीक्षण प्रा. सदा कऱ्हाडे, श्री. बाबा परूळेकर आणि प्रा. दिगंबर पाध्ये यांनी केले तर बक्षिसांचे वितरण मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष नटवर्य दाजीसाहेब भाटवडेकर यांनी केले. या वर्षीहि नेपथ्य आणि प्रकाश योजनेचे साहित्य आणि अनुभवी कर्मचारी 'मुंबई मराठी साहित्य संघाने' उपलब्ध करुन दिले.

स्पर्धांना जोडूनच तीन नाटके सादर करण्यात आली नाट्य संपदा निर्मित 'थँक्यू मि. ग्लाड' आणि चंद्रलेखा प्रकाशित 'रामशास्त्री' व 'गुडबाय डॉक्टर' ही नाटके म्हणजे उपनगरातील प्रेक्षकांना लाभलेली अपूर्व पर्वणीच ठरली. रसिकांच्या उदार आश्रयामुळे संस्थेला आर्थिक सहाय्य मिळू शकले.

**मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन (अधिवेशन २२ वे) :** नोव्हेंबर १९७५ मध्ये मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलनाचे २१ वे अधिवेशन मुंबई मराठी साहित्य संघाने साहित्य संघ मंदिरातच भरविले होते. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. वा. रा. ढवळे यांनी ठिक ठिकाणच्या संस्था साहित्य संमेलन भरविण्यास पुढे येत नसल्यामुळे साहित्य संघालाच अधिवेशन भरविणे प्राप्त झाले असून हे संमेलन सातत्याने सुरु ठेवणे दुरापास्त होत आहे अशी जाहिर खंत व्यक्त केली. 'प्रबोधन गोरेगांव'च्या कार्यकारी मंडळाने या आवाहनास तात्काळ प्रतिसाद देण्याचे ठरवून त्याच अधिवेशनात पुढील २२ वे अधिवेशन गोरेगांव येथे भरविण्याची जबाबदारी घेण्याची मनिषा प्रकट केली. साहित्य संघाने या विनंतीला संमती देऊन संस्थेचे निमंत्रण स्वीकारले व तसे जाहिर केले. आणि त्याच दिवसापासून संस्थेचे कार्यकर्ते आगामी अधिवेशन संपूर्ण यशस्वी करावयाचे इतकेच नव्हे तर अपूर्व थाटामाटात आयोजित करावयाचे या एकाच जिद्दीने कामास लागले. अत्यंत पद्धतशीरपणे संपूर्ण कार्याची रुपरेषा आखण्यात येऊन या भव्य कार्यक्रमाच्या यशासाठी या परिसरातील अन्य संस्था व सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तिंचे सहकार्य घेण्याचे ठरले. यासाठी घेण्यात आलेल्या सभेत उपस्थितांपुढे एकूण कार्यक्रमाची रुपरेषा सर्व तपशीलांनिशी मांडण्यात आली आणि सर्वांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले. या व्यापक कार्याच्या अंमलबजावणीसाठी विविध समित्या स्थापन करण्यात येऊन त्या समित्यांवर कार्यकारी मंडळाचे सदस्य व संस्था सभासदां बरोबरच त्या त्या विशिष्ट विषयाचे जाणकार व अनुभवी साहित्यिक, पत्रकार, समाजसेवक, प्राध्यापक, शिक्षक, कलाकार अशी निरनिराळ्या क्षेत्रातील मंडळी नियुक्त करण्यात आली. या सर्वांनीच साहित्य संमेलन हे

आपलेच काम मानून जिव्हाळ्याने परिश्रम घेतले.

संमेलनाच्या निमित्ताने एक आकर्षक व माहितीपूर्ण स्मरणिका काढण्यात आली होती. अनेक नामवंत साहित्यिकांकडून या स्मरणिकेसाठी मुद्दाम लेख लिहून घेण्यात आले. जाहिरातदारांनी भरपूर जाहिराती देऊन भरघोस आर्थिक सहाय्य केले. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याने या संमेलनासाठी रु. १००० अनुदान रुपाने दिले. संमेलनासाठी प्रशस्त व्यासपीठ, विस्तीर्ण सभामंडप, भव्य प्रवेशद्वारे आणि विविध प्रदर्शनांची दालने उभारण्यात येऊन या सर्व परिसरास **'कै वि. स. खांडेकर साहित्य मंदिर'** असे संबोधण्यात आले. मुख्य प्रवेशद्वारास **'कै. चिं. त्र्यं. खानोलकर'** यांचे नांव देण्यात आले. आवारातील विविध दालनांमधून नामवंत साहित्यिकांची छायाचित्रे, दुर्मिळ हस्ताक्षरे, ग्रंथसंग्रह व साहित्यिकांची रांगोळी चित्रे यांची प्रदर्शने भरविण्यात आली होती. एकंदरीत हे संमेलन मोठ्या कलापूर्ण पविऱ्यात सादर केले गेले. सभामंडपाचा आराखडा, प्रवेशद्वाराचे डिझाईन यांपासून निमंत्रितांचे आकर्षक बिल्ले, स्मरणिकेचे मुखपृष्ठ आणि संमेलनासाठी मुद्दाम तयार करण्यात आलेले बोधचिन्ह या सर्वांची संकल्पना कार्यकारी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव सारंग यांची होती. या सोहळ्याची कलात्मक रचना करण्याचे श्रेय त्यांना व त्यांच्या सहाय्यक कलाकारांना आहे.

संमेलनातील सर्वच कार्यक्रम चढत्या श्रेणीने रंगत गेले. परिसंवाद, काव्यगायन, कथाकथन, नाट्यप्रयोग असे सर्व कार्यक्रम साहित्यिकांनी व कलाकारांनी प्रभावीपणे सादर केले. उद्घाटनापासून ते समारोपापर्यंत प्रत्येक कार्यक्रमास रसिकांची प्रचंड उपस्थिती हे या अधिवेशनाचे वैशिष्ट्य व यशाचे गमक मानावे लागेल. संमेलनाचे उद्घाटन मुंबईचे महापौर श्री. मनोहर जोशी यांनी केले. या अधिवेशनाच्या निमित्ताने संमेलनाध्यक्ष श्री. रणजित देसाई यांचा स्नेहपूर्ण सहवास कार्यकर्त्यांना लाभला. संभाषण चातुर्य आणि विनम्र लाघवी स्वभावाने त्यांनी सर्वांचीच मने जिंकली. विशेषतः 'मला प्रबोधन संस्थेचा एक स्वयंसेवक करुन घ्या' असे या थोर साहित्यिकाने म्हटले तेव्हां तर तुडुंब भरलेली सभा हेलावून गेली.

या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्ष पदाची धुरा संस्थेचे अध्यक्ष श्री. निळकंठ ज. सावंत यांनी मोठ्या कुशलतेने व जबाबदारीने पेलून संस्थेला उज्ज्वल यश प्राप्त करुन दिले संस्थेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरलेले हे संमेलन सर्व संबंधितांच्या चिरकाल स्मरणात राहील. सर्व वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी आणि दूरदर्शन या विविध माध्यमांनी संमेलनास व्यापक प्रसिध्दी दिली.

### एस. एस. सी. व्याख्यानमाला ( वर्ष ५ वे )

एस्. एस्. सी परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाव्यतिरिक्त अधिक मार्गदर्शन उपलब्ध करुन देणाऱ्या या व्याख्यानमालेचे हे पाचवे वर्ष. यावेळी ही व्याख्यानमाला नवीन शैक्षणिक आकृतिबंधाप्रमाणे इ. १० वी एस. एस. सी परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ठेवण्यात आली होती. दि. ८ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी पर्यंत आय. बी. पटेल शाळेच्या सभागृहात घेण्यात आलेल्या या विनामूल्य व्याख्यानमालेस सुमारे ७०० विद्यार्थी उपस्थित होते. नामवंत शिक्षकांना प्रमुख विषयांवर माहितीपूर्ण व उपयुक्त व्याख्याने देण्यासाठी पाचारण करण्यात आले होते.

**पाचवे वर्धापनदिन संमेलन :** दि. २० मार्च रोजी गुढीपाडव्याला संस्थेचे पाचवे वर्धापनदिन संमेलन आयोजित करण्यात आले होते. यानिमित्ताने कलावैभव निर्मित 'लंपडाव' या तुफान विनोदी नाटकाचा प्रयोग सभासद व निमंत्रितांसाठी ठेवण्यात आला होता. मार्च १९७६ च्या १० वी एस. एस. सी. परीक्षेत गोरेगांवातील मराठी माध्यमाच्या शाळांमधून सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी झालेल्या कु. गौतम भोबे या विद्यार्थ्याचा संस्था अध्यक्षांचे हस्ते सत्कार करुन त्यास रोख रु. ५१/ चे पारितोषिक देण्यात आले.

## प्रबोधन व्याख्यानमाला ( वर्ष ५ वे )

जीवनाच्या विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तिंची निरनिराळ्या विषयावर व्याख्याने आयोजित करुन समाज प्रबोधनच्या कार्याला चालना देण्याचे व्रत संस्थेने यावर्षीहि अखंडित ठेवले. 'वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या मर्यादा' (सर्वश्री आप्पा पेंडसे, माधव मनोहर, बाळ सामंत व नारायण आठवले) 'लोककलांचा फुलोरा' (डॉ. आप्पासाहेब इनामदार व अन्य कलाकार) 'धर्मपरायण पांडवांच्या अधर्मलीला' (श्री. दाजी पणशीकर) 'थोरले बाजीराव' (श्री. सेतुमाधवराव पगडी) 'पहिले मराठी विनोदी गुरुशिष्य' व 'चिमणरावाचे चऱ्हाट' (प्रा. द. मा. मिरासदार) अशाप्रकारे ज्ञान आणि मनोरंजन साधणारी विभिन्न विषयांवरील लोकप्रिय वक्त्यांची भाषणे योजून लोकशिक्षणाची परंपरा अव्याहत ठेवण्याचे कार्य संस्थेने निष्ठेने केले.

## प्रबोधन बालवाचनालय

शालेय विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांखेरीज अन्य पुस्तके उपलब्ध करुन देऊन या संस्कारक्षम वयातच वाचनाची गोडी वृध्दिंगत करण्याच्या हेतूने ४ वर्षांपूर्वी संस्थेच्या विद्यमाने 'प्रबोधन विनामूल्य बालवाचनालय' स्थापन करण्यात आले. या अवधित या केंद्रात सुमारे १००० पुस्तकांची भर पडली असून शेकडो विद्यार्थ्यांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. इ. ४ थी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना विनामूल्य असलेल्या या वाचनालयाचे मुख्य केंद्र संस्थेच्या कार्यालयात असून दुसरी शाखा मोतीलाल नगर विभाग ३ याठिकाणी चालविली जाते. दोन्ही मिळून आज एकूण सभासद संख्या २०० आहे.

संस्थेने आजवर केलेल्या कार्यात असंख्य हितचिंतकांचा, सभासदांचा, कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकार, अन्य संस्था यांच्या सक्रीय सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले आहे. संस्थेचे सरकारमान्य हिशेबतपासनीस मेसर्स एस. एस. नायक आणि कं. व अंतर्गत हिशेबतपासनीस श्री. रामचन्द्र जोशी यांनी बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने यावर्षी संस्थेला रु. १२,००० चे अनुदान दिले या बहुमोल उदार मदतीबद्दल संस्था महानगरपालिकेची व अनुदान समितीवरील नगरसेवक सदस्यांची अत्यंत ऋणी आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य खात्याने यावर्षीहि संस्थेला रु. १,०००/- चे अनुदान दिले आहे. महाराष्ट्र शासनाचीहि संस्था आभारी आहे. अशा सर्व संबंधितांचा हाच लोभ सदैव कायम राहील असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र,
कार्यकारी मंडळ १९७६-७७

---

अहवाल वर्षाच्या कालावधित संस्थेच्या पुढील सभासदांचे दु:खद निधन झाले —

**श्री. अरुण उसेकर**

**सौ. नलिनी सामंत**

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो. त्यांच्या आप्तेष्टांच्या दुःखात संस्था सहभागी आहे.

— कार्यकारी मंडळ.

With Best Compliments From :

# M. K. PRINTERS

COMMERCIAL PRINTERS

10, Nirmal Industrial Estate
Ram Mandir Road, Goregaon (West)
BOMBAY-400 062

Phone : 68 25 46

'प्रबोधन' गोरेगांव द्वारा आयोजित

## विविध शैक्षणिक उपक्रम

★ एस. एस. सी. विद्यार्थी मार्गदर्शन व्याख्यानमाला ( प्रतिवर्षी फेब्रुवारी महिन्यात )

★ गोरेगांव विभागातून एस. एस. सी. परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व रोख पारितोषिके.

★ 'प्रबोधन' वक्तृत्वस्पर्धा : अखिल महाराष्ट्रातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ( प्रतिवर्षी सप्टेंबर महिन्यात )

★ 'प्रबोधन' विनामूल्य बालवाचनालय : इयत्ता ४ थी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी.

शाखा क्र. १ : 'प्रबोधन' कार्यालय
विद्युत, लो. टिळक नगर रस्ता क्र. ४,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगांव ( प. )

शाखा क्र. २ : चाळ क्र. ७६, मोतीलाल नगर विभाग ३
महात्मा गांधी मार्ग, गोरेगांव ( प. )

विद्यार्थी मित्रांनो !
या सर्व शैक्षणिक सेवांचा अधिकाधिक लाभ घ्या !!

आणि

## भव्य कार्यक्रम

- एकांकिका स्पर्धा : अखिल महाराष्ट्रातील हौशी कलाकारांसाठी (प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यात)
- प्रबोधन व्याख्यानमाला : सुप्रसिद्ध वक्त्यांची विविध विषयांवरील व्याख्याने (प्रतिवर्षी मे महिन्यांत)
- रंगावली प्रदर्शन : हौशी कलाकारांच्या नयनमनोहर रांगोळी चित्रांचे भव्य प्रदर्शन ( दिपावलीच्या सुट्टीत )
- वर्धापनदिन संमेलन : नाविन्यपूर्ण सांस्कृतिक सोहळा, सोबत, आघाडीवरील कलाकारांचे लोकप्रिय कार्यक्रम (प्रत्येक गुढीपाडव्याला)

प्रबोधन गोरेगांव

सेवेची पाच वर्षे पूर्ण करून

सहाव्या वर्षी सुरु करीत आहे ० ० ०

क्रीडा क्षेत्रातील नवीन पर्व —

# प्रबोधन क्रीडा महोत्सव

मुंबई पश्चिम उपनगरातील

माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांच्या

विविध क्रीडा स्पर्धा

— डिसेंबर १९७७ मध्ये गोरेगांव येथे.